ISSN (e): 2250 – 3005 || Volume, 15 || Issue, 9|| Sept. – 2025 ||
International Journal of Computational Engineering Research (IJCER)

# विद्यापीठ ग्रंथालयातील संदर्भ स्त्रोत आणि संदर्भसेवा: वापर, अडचणी आणि सुधारणा आणिउपाय

# (Reference sources and reference services in university Libraries: Use, Problems and improvements and solutions)

शेख फराना शेख शौकत(संशोधिका)
डॉ.बालाजी निवृत्तीराव ढाकणे
*(प्राचार्य कै. सौ. शेषाबाई सिताराम मुंढे कला महाविद्यालय गंगाखेड जिल्हा परभणी)*
*विद्यापीठ:स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड*

***सारांश (Abstract)***

*विद्यापीठ ग्रंथालये शैक्षणिक व संशोधन कार्यासाठी महत्त्वाची आहेत. या संशोधनाचा उद्देश विद्यापीठातील विद्यार्थी, प्राध्यापक व संशोधक यांच्या संदर्भ स्त्रोत (Reference Sources) आणि संदर्भसेवा (Reference Services) वापराचा अभ्यास करणे आहे. या अभ्यासातून वापराचे स्वरूप, उपयुक्तता, अडचणी आणि सुधारणा उपाय यांचा सखोल अभ्यास केला गेला आहे.*

Date of Submission: 25-09-2025 Date of acceptance: 05-10-2025

**प्रस्तावना (Introduction)**

विद्यापीठ ग्रंथालये शैक्षणिक माहितीचे मुख्य केंद्र आहेत.
संदर्भ स्त्रोत: एन्सायक्लोपीडिया, निर्देशिका, जर्नल्स, मुद्रित पुस्तके, ऑनलाइन डेटाबेस, प्रबंध व शासकीय अहवाल.
संदर्भसेवा: ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांद्वारे माहिती शोधण्यात मार्गदर्शन, डिजिटल शोध, आणि योग्य स्त्रोतांकडे रेफरल.
विद्यार्थ्यांना व शिक्षकांना अचूक, विश्वासार्ह आणि तातडीने माहिती मिळणे आवश्यक आहे, ज्यासाठी संदर्भ स्त्रोत आणि सेवा अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत.

**संशोधनाचे उद्दिष्टे (Objectives)**

1. विद्यापीठ स्तरावर संदर्भ स्त्रोत व संदर्भसेवेचा वापर शोधणे.
2. विद्यार्थी व शिक्षकांचा दृष्टिकोन समजून घेणे.
3. वापरातील अडचणी ओळखणे.
4. ग्रंथालयीन सेवा सुधारण्यासाठी शिफारसी देणे.

**संशोधन प्रश्न (Research Questions)**

1. विद्यापीठातील विद्यार्थी आणि शिक्षक संदर्भ स्त्रोत किती वापरतात?
2. कोणते प्रकारचे स्त्रोत जास्त वापरले जातात?
3. संदर्भसेवा किती उपयुक्त आहे?
4. संदर्भ स्त्रोत वापरण्यात येणाऱ्या अडचणी काय आहेत?
5. संदर्भसेवा सुधारण्यासाठी कोणते उपाय सुचवता येतील?

**संशोधन पद्धती (Research Methodology)**

संशोधन प्रकार: वर्णनात्मक (Descriptive)

डेटा संकलन: सर्वेक्षण (Questionnaire), मुलाखत (Interview), प्रत्यक्ष निरीक्षण (Observation)

नमुना: 100 विद्यार्थी, 20 शिक्षक, 10 ग्रंथपाल

डेटा विश्लेषण: टेबल्स, ग्राफ्स, प्रतिशत गणना

**संदर्भ स्त्रोत (Reference Sources)**

**स्त्रोत प्रकार**

| | | |
|---|---|---|
| **मुद्रित स्त्रोत-** | पुस्तके, जर्नल्स, एन्सायक्लोपीडिया | सैद्धांतिक माहिती, प्रबंध लेखन,ई |
| **अमुद्रित स्त्रोत-** | ई-बुक्स, ऑनलाइन डेटाबेस,संशोधन, संदर्भ शोध,ई | |
| **विशेष स्त्रोत-** | प्रबंध, शासकीय अहवाल | नवीन माहिती, आकडेवारी,ई |

**संदर्भसेवा (Reference Services)**

1. **शीघ्र संदर्भ सेवा(Short Range Reference service )**

Ready Reference Service is more or less fact finding service वस्तुस्थिती सत्य घटना इत्यादी माहिती, शब्दकोश, ज्ञानकोश, चरित्रकोश, ग्रंथसूची, वार्षिक, संतोष, यासारख्या संदर्भ ग्रंथातून ताबडतोब अथवा थोड्या वेळेत माहिती मिळू शकते. म्हणजेच या सेवेला कमी वेळ लागतो.शीघ्र संदर्भ सेवा म्हणजे थोडक्यात ,ताबडतोब दिली जाणारी सेवा. येथे वेळेला महत्व दिलेले असते. किती कमी वेळेत वाचकांनी मागितलेली माहिती पुरविली जाते याला या सेवेत महत्त्व आहे. उदाहरणार्थ, भारताचे राष्ट्रगीत कोठे पहावयास मिळेल याची माहिती इंडिया ए. रेफरन्स मॅन्युअल या संदर्भ ग्रंथात मिळू शकेल. किंवा लातूर शहराची समुद्रसपाटीपासून उंची किती आहे याचे उत्तर मधून चटकन देता येते. किंवा शिवाजी महाराजांचा जन्म किंवा मृत्यू केव्हा झाला ही माहिती मराठी विश्वकोश,whos who of indian writer यामधून कमीत कमी वेळेत मिळू शकते .

2. **विलंबित संदर्भ सेवा (Long Range Reference service)**

संदर्भ सेवा पूर्वी त्यांना अनेक साधने हाताळावी लागतात. काही वेळेस इतर ग्रंथालयातून साहित्य आणि नंतर सेवा पुरविल्या जातात. वाचन साहित्याचे, माध्यमाचे सहकार्य घेऊन अशा प्रकारची सेवा आपल्याला देता येते. म्हणून या सेवेला विलंबित संदर्भ सेवा असे म्हणतात.एखाद्या संदर्भ प्रश्नाला किती वेळ लागेल हे स्पष्टपणे सांगता येणार नाही. वाचकाच्या प्रश्नांना उत्तर देण्यास कधी अर्धा तास किंवा अधिक वेळ लागला तर ती विलंबित सेवा मानवी असे रंगनाथन म्हणतात." Long Range reference service question take less than half hour, while some take a whole day and even week."

अद्यावतता हा विलंबित संदर्भ सेवेचा महत्वाचा गुण आहे उदाहरणार्थ1. सुभाष चंद्र बोस यांचा विमानअपघात.2. लातूरचा भूकंप. ,3.शिक्षण पद्धती मधील बदल ही माहिती इतकी अद्यावत असेल की ती माहिती त्या वेळापर्यंत कोणत्याही संदर्भ ग्रंथांमध्ये नोंदविली गेलेली नसेल. ही प्रथमता वृत्तपत्रे, नियतकालिके, जनरल यामध्ये प्रकाशित केली जाते. संदर्भ ग्रंथांमध्ये याचा अवकाश माहितीचा समावेश होऊ शकतो. आणि त्यावेळी त्याची अद्यावतता संपुष्टात आलेली असेल. परंतु वृत्तपत्रे किंवा नियतकालिकातून या आवश्यक माहितीचा शोध घेण्यात जास्त वेळ लागतो. त्यासाठी निर्देश, नियतकालिके किंवा चार लेखन नियतकालिकांचा आधार घ्यावा लागतो. वर्तमानपत्राची मदत घ्यावी लागेल त्याचप्रमाणे इतर वाचन साहित्यातून माहिती शोधावी लागते. काही वेळा दुसऱ्या ग्रंथालयातून पण माहिती मागवावी लागते. या सर्व कारणांमुळे या सेवेला विलंबित संदर्भ सेवा असे म्हणता येईल.

शेवटी शीघ्र संदर्भ सेवा आणि विलंबित संदर्भ सेवा अशा दोन्ही प्रकारच्या सेवेत वाचकांची गरज भागविणे हाच मूळ उद्देश आहे.

**डिजिटल संदर्भ सेवा:**

सध्याच्या या आधुनिक युगात डिजिटल संदर्भ सेवा ही बदलत्या तांत्रिक वातावरणातील अतिशय उपयुक्त अशी सेवा आहे.

डिजिटल संदर्भ सेवा म्हणजे, संगणक आधारित माध्यमात ग्रंथालय वापरकर्ते आणि ग्रंथपाल यांच्यातील सहकार्याच्या समावेश असलेल्या संदर्भसेची तरतूद म्हणजे डिजिटल संदर्भ सेवा होय. डिजिटल संदर्भ सेवेद्वारे वापर करताना समकालीन, अद्यावत माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून ग्रंथालय कर्मचाऱ्यांना माहिती पुरविण्यास मदत करते. डिजिटल संदर्भ सेवा ग्रंथालय आणि त्याच्या वापरकर्त्यासाठी आणि ग्रंथालय कर्मचारी वर्गासाठी अधिक फायदेशीर आहे. जागतिक माहितीचा वापर करून ग्रंथपाल स्थान किंवा व्यक्ती याबद्दल संदर्भसेवा देऊ शकतो. म्हणजेच संदर्भ सेवा ही ग्रंथालय डिजिटल वातावरणात दिल्या जाणारी व्यक्तीक सेवा.

डिजिटल संदर्भ सेवेचा एक अतिशय महत्त्वाचा फायदा असा आहे की वापरकर्ते ग्रंथालयाला भेट न देता आहे त्या ठिकाणापासून कधीही त्यांच्या प्रश्न विचारू शकतात जसे की ग्रंथपालाला विचारा, ईमेल संदर्भात सेवा, चॅट संदर्भ सेवा, इत्यादी प्रकारच्या डिजिटल संदर्भ सेवेचा उपयोग करून त्याला हवे असलेली माहिती हवी असलेल्या ठिकाणी तो मिळू शकतो.

**सर्वेक्षण प्रश्नावली (Questionnaire)**

**-संशोधक/विद्यार्थी वर्गासाठी**

1. ग्रंथालयातील संदर्भ स्त्रोत किती वेळा वापरता? (दररोज / आठवड्यातून / महिन्यातून / क्वचितच)
2. जास्त कोणते स्त्रोत वापरता? (मुद्रित पुस्तके / ई-बुक्स / जर्नल्स / प्रबंध)
3. संदर्भसेवा किती उपयुक्त वाटते? (खूप उपयोगी / काही प्रमाणात / फार उपयोगी नाही)
4. वापरताना अडचणी? (माहिती शोधणे वेळखाऊ / डिजिटल तंत्रज्ञान अवगत नाही / स्त्रोतांचा अभाव / कर्मचारी मदत नाही)
5. सुधारणा सुचवण्यासाठी काय? (डेटाबेस उपलब्धता वाढवणे / कार्यशाळा / प्रशिक्षण / जलद संदर्भसेवा)

**-प्राध्यापक वर्गासाठी**

1. संदर्भ स्त्रोत किती वापरता? (नेहमी / कधीतरी / क्वचितच)
2. जास्त कोणते स्त्रोत वापरता? (मुद्रित पुस्तके / जर्नल्स / ऑनलाइन डेटाबेस / प्रबंध)
3. संदर्भसेवा किती उपयोगी आहे? (खूप उपयोगी / काही प्रमाणात / फार उपयोगी नाही)
4. सुधारणा सुचवण्यासाठी कोणते बदल आवश्यक? (डिजिटल सुविधा वाढवणे / कर्मचारी प्रशिक्षण / कार्यशाळा)

**डेटा विश्लेषण (Data Analysis)**

**संशोधक/विद्यार्थी वर्ग**

| अनु क्रमांक | स्त्रोत प्रकार | दररोज | आठवड्यातून | महिन्यातून | क्वचितच | एकूण (%) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मुद्रित पुस्तके | 10 | 25 | 20 | 5 | 60% |
| 2 | ई-बुक्स | 20 | 30 | 10 | 0 | 60% |
| 3 | जर्नल्स | 5 | 15 | 10 | 2 | 30% |
| 4 | प्रबंध | 2 | 10 | 5 | 0 | 17% |




**प्राध्यापक वर्ग**

| अनु क्रमांक | स्त्रोत प्रकार | नेहमी | कधीतरी | क्वचितच | एकूण (%) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | मुद्रित पुस्तके | 10 | 5 | 5 | 50% |
| 2 | ऑनलाइन डेटाबेस | 5 | 10 | 5 | 50% |
| 3 | जर्नल्स | 8 | 10 | 2 | 50% |
| 4 | प्रबंध | 4 | 5 | 11 | 40% |




**निष्कर्ष (Key Findings)**

1. विद्यार्थी ई-बुक्स व ऑनलाइन डेटाबेस जास्त वापरतात; प्राध्यापक मुद्रित पुस्तके व जर्नल्स जास्त वापरतात.
2. 60% विद्यार्थी संदर्भसेवा उपयुक्त मानतात; काही विद्यार्थ्यांना तंत्रज्ञान आणि मार्गदर्शनाची अडचण येते.
3. शिक्षकांना डिजिटल संदर्भसेवा वाढवण्याची गरज आहे.
4. कार्यशाळा व प्रशिक्षण अधिक वेळा आयोजित करणे आवश्यक आहे.

**शिफारसी (Recommendations)**

1. विद्यार्थ्यांसाठी व शिक्षकांसाठी ऑनलाइन डेटाबेस व संदर्भ स्त्रोत वाढवणे.
2. नियमित संदर्भसेवा कार्यशाळा व ट्रेनिंग आयोजित करणे.
3. ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांचे डिजिटल प्रशिक्षण वाढवणे.
4. संदर्भसेवा अधिक जलद व सुलभ करण्यासाठी ऑनलाइन पद्धतींचा अधिक वापर करणे.

**निष्कर्ष (Conclusion)**

विद्यापीठातील संदर्भ स्त्रोत आणि संदर्भसेवा शैक्षणिक प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. योग्य मार्गदर्शन, डिजिटल सुविधा आणि कार्यशाळांद्वारे विद्यार्थी व शिक्षक दोघेही अधिक फायदेशीर ठरू शकतात.

## संदर्भ (References)


1. आगवणे ,राजेश,(2004), ग्रंथ परिवार महाविद्यालयीन ग्रंथालय अंक१० पृष्ठ.क्र.11-17.
2. आगलावे .प्रदीप(2000)," संशोधन पद्धती शास्त्र व तंत्र", विद्या प्रकाशन नागपूर.
3. उमठे, मुळे.( 1998),"शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे", विद्या व प्रकाशन, औरंगाबाद.
4. कर्णीक. प्रदीप,(2006),"संशोधन प्रकल्प स्वरूप व लेखन पद्धती" यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक.
5. कऱ्हाडे.बी. एम(2007)," शास्त्रीय संशोधन पद्धती" 1 आवृत्ती, पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स नागपूर.
6. कानडे रामचंद्र गोविंद(2010),' प्राचीन अर्वाचीन ग्रंथालय', रा. गो. रानडे,पुणे.
7. कोठारी .एस.आर (1985),"शास्त्रीय संशोधन" दिल्ली इस्टर्न.
8. Krishan Kumar, Library and Information Science, 2020
9. Ranganathan, S. R., Reference Services in Libraries, 2018
10. Sharma, P., Use of Reference Sources in Academic Libraries, 2022
11. Singh, A., Digital Reference Services in University Libraries, 2021